दैनिक लोकांकीत

सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र

मुख्य संपादक–संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 •मंगळवार दि.३ मार्च २०२६ • अंक-५३ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.




# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे कापूस खरेदीला १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

## शेतकऱ्यांच्या हितासाठी आ.सुधीर मुनगंटीवार यांचा यशस्वी पाठपुरावा

**मुंबई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या अडचणींप्रती कायम संवेदनशील भूमिका घेणारे राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आ. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे कापूस खरेदीसाठीची अंतिम मुदत २७ फेब्रुवारीवरून १५ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. अतिवृष्टीमुळे कापूस काढणीस उशीर झाल्याने एमएसपीचा लाभ घेण्यापासून वंचित राहण्याची भीती असलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री ना.गिरिराजजी सिंह यांच्याकडे पत्र व दूरध्वनीद्वारे केलेल्या प्रभावी पाठपुराव्यामुळे हा निर्णय शक्य झाला असून, याबद्दल आ. मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह यांचे आभार मानले आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी यापूर्वीच कापूस खरेदीची अंतिम मुदत वाढविण्याची मागणी मुख्यमंत्री तसेच भारतीय कपास निगम (सीसीआय) मुंबईचे चेअरमन श्री. ललितकुमार गुप्ता यांच्याकडे केली होती. राज्यातील विविध भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतजमिनीत ओलावा कायम राहिल्याने कापूस वेचणी व काढणीला मोठा विलंब झाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यासह विदर्भातील अनेक भागांत शेतकऱ्यांच्या घरी अद्याप कापूस पोहोचलेला नसल्याने एमएसपी अंतर्गत विक्री करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. यासंदर्भात आ. मुनगंटीवार यांनी आग्रही मागणी केली होती.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांना निवेदन सादर करून समस्या मांडल्या होत्या. त्या निवेदनाची तातडीने दखल घेत आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पत्र पाठवत तसेच केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराजजी सिंह यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधत मुदतवाढीची मागणी लावून धरली. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे अखेर कापूस खरेदीसाठी १५ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.तसेच, सीसीआयमार्फत सुरू असलेल्या खरेदी प्रक्रियेत एकही शेतकरी वंचित राहू नये यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्याची मागणीही आ. मुनगंटीवार यांनी केली आहे. वाढीव मुदतीच्या कालावधीत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी करून एमएसपीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही आ. मुनगंटीवार यांनी केले आहे.



राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या संवेदनशील व प्रभावी नेतृत्वामुळे हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# आणखी एक न्यायालयीन लढाईत धनंजय मुंडेंचा विजय

## लोकायुक्तांचा निकालही धनंजय मुंडेंच्या बाजूने!

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आ. धनंजय मुंडे यांचा आणखी एका न्यायालयीन लढाईत विजय झाला असून, कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट यासह वेगवेगळ्या आरोप करणाऱ्या अंजली दमानिया यांचे सर्व आरोप राज्य लोक आयुक्तांनी फेटाळून लावले आहेत.धनंजय मुंडे हे राज्याचे कृषिमंत्री असताना एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी योजनेंतर्गत विशेष कृती कार्यक्रम राबवून त्याअंतर्गत नॅनो खते, कापूस बॅग, बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप आदी साहित्य खरेदी करण्यात आले, त्यामध्ये अनियमितता करून शेकडो कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता. या संदर्भात माननीय मुंबई उच्च न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या बाजूने निकाल दिला व संबंधितांचे आरोप फेटाळून लावल्यानंतर अंजली दमानिया यांनी राज्य लोक आयुक्तांकडे याबाबत तक्रार केली होती. लोकायुक्त यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे संपूर्णतः ऐकून घेऊन, सर्वोच्च न्यायालयाचे विविध निकाल तसेच संविधानिक तरतुदींचा अभ्यास करून माननीय मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल हा स्वयंस्पष्ट असून या प्रकरणातील आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसून सदर आरोप फेटाळून लावत असल्याचे आपल्या निकालामध्ये स्पष्ट केले आहे. उच्च न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या विरोधातील पडगिलवार यांच्यासह विविध जनहित याचिका यांच्यावरती एकत्रित निकाल देताना हे आरोप केवळ व्यावसायिक दृष्टिकोनातून व खोट्या पुराव्यांच्या आधारे केलेले असून राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयावर व्यवसायिक दृष्टीने खोटी माहिती समोर आणून शंका उपस्थित करणे हे कायद्याला धरून नसल्याचे स्पष्ट करत, सर्व याचिका फेटाळून लावल्या होत्या. तसेच याचिकाकर्त्यांना एक लाख रुपयांचा दंड ठोठावला होता.त्यानंतर संबंधित याचिकाकर्त्यांना जर निकाल मान्य नसता तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात या विरोधात अपील करायला हवे होते मात्र त्यांनी अद्याप अपील न करता दंड भरला; याचाच अर्थ याचिका करते यांना सुद्धा उच्च न्यायालयाने दिलेला निकाल मान्य होता. उच्च न्यायालयाने या निकालामध्ये नोंदविलेली निरीक्षणे ही स्वयंस्पष्ट, निर्णायक व शासनाच्या धोरणाला अनुसरून असल्याने तसेच याचिकाकर्त्या अंजली दमानिया यांच्याकडे संबंधित याचिकेमध्ये जोडलेल्या बाबींव्यतिरिक्त, बनावट पुरावे असून कुठलाही ठोस पुरावा किंवा दखल घेण्यायोग्य काहीही नसल्याने यामध्ये आणखी वेगळी सुनावणी घेण्याचा कोणताही मुद्दा शिल्लक राहत नाही, असेही लोकायुक्तांनी आपल्या निकालात स्पष्ट केले आहे. कृषी साहित्य खरेदी सोबतच अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात ऑफिस प्रॉफिट सह विविध आरोप केले होते. यासंदर्भात धनंजय मुंडे यांचे वकील श्री शार्दुल सिंह यांनी धनंजय मुंडे यांची बाजू मांडताना खासदार जया बच्चन यांच्या संबंधातील सर्वोच्च न्यायालयाच्या एका खटल्याचा संदर्भ देत ऑफिसर प्रॉफिट बाबत लोकायुक्तांकडे देण्यात आलेली माहिती ही चुकीची व अर्धवट असल्याचे नमूद केले. या प्रकरणात देखील संविधानातील ठराविक काही कलमे, लोकप्रतिनिधीत्व कायदा, लोकप्रतिनिधींच्या हक्कांचे संरक्षण यांसह सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास केला असून, लोक आयुक्तांच्या अखत्यारीतील कोणताही ऑफिस ऑफ प्रॉफिटचा मुद्दा किंवा त्या अनुषंगाने कुठलाही आरोप सिद्ध होत नाही; तसेच याचिकाकर्ते अंजली दमानिया यांनी याबाबत देखील कुठलाही महत्त्वाचा नवीन पुरावा त्यांच्या पुरवणी जबाबात देखील सादर केलेला नाही. त्यामुळे ऑफिस ऑफ प्रॉफिट चा मुद्दा हा देखील निकाली काढला असून, त्यातही धनंजय मुंडे यांना क्लीन चीट देण्यात आली आहे. दरम्यान मागील एका वर्षापासून अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात जे काही आरोप केले ते उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर आता लोकायुक्तांनी देखील सदर आरोप फेटाळून लावले असल्याने, अंजली दमानिया यांच्या केवळ तोंडाच्या वाफा व धनंजय मुंडे यांच्या बदनामीचा असफल प्रयत्न होता, हे सिद्ध झाले आहे, अंजली दमानिया यांना या निकालाने एकप्रकारे न्यायव्यवस्थेने एक प्रकारची चपराक लावली आहे, असे म्हणावे लागेल. दरम्यान धनंजय मुंडे यांच्या वरती मागील काही महिन्यात वेगवेगळ्या प्रकारचे अनेक आरोप करण्यात आले, त्यावरून त्यांची बदनामी करण्याची एकही संधी विरोधकांनी सोडली नाही, मात्र मुंडे यांच्या विरोधातील एक एक आरोप खोटा सिद्ध होण्याची मालिका देखील सुरू असून आज त्यात या निकालाने महत्वाची भर पडली आहे.

# उरण विधानसभा मतदार संघातील समस्या प्राधान्याने सोडविणार -खा.श्रीरंग आप्पा बारणे

## शिवसेना उरण विधानसभा जनसंपर्क कार्यालयाचे खा.श्रीरंग बारणे यांच्या हस्ते उदघाटन

**उरण । प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदार संघातील विविध समस्या, प्रश्न सोडविण्यासाठी उरण विधानसभा जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले असून उरण विधानसभा मतदार संघातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहू, जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध राहू असे आश्वासन श्रीरंग आप्पा बारणे यांनी दिले.शिवसेनेच्या उरण विधानसभा जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन श्रीराजनगर कॉम्प्लेक्स, उरण कामठा रोड, गाडे हॉस्पिटलच्या शेजारी येथे रविवार दि. १ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता करण्यात आले. यावेळी जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन करून खासदार श्रीरंग बारणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी पनवेल महानगर पालिकेचे नगरसेवक तथा पनवेल विधानसभा रायगड जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे,उरण विधानसभा रायगड जिल्हा प्रमुख विनोदभाऊ साबळे,अल्पसंख्यांक जिल्हा अध्यक्ष समद भोंगले, जिल्हा युवा अध्यक्ष प्रीतम सुर्वे,जेष्ठ शिव सैनिक मनोहर ठाकूर,रायगड जिल्हाध्यक्ष मेघाताई दमडे,जिल्हा संघटक महेंद्र पाटील,उपजिल्हा अध्यक्ष वैजयंती ठाकूर,तालुका



प्रमुख दिपक ठाकूर,उप तालुका प्रमुख महिला रुबीना कुटी,निवडणूक प्रभारी सुनिल भोईर,चाणजे विभाग प्रमुख अक्षय म्हात्रे,उप शहर प्रमुख वीरू चाळके,शाखा प्रमुख संदेश म्हात्रे,गणेश म्हात्रे,दिनेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खासदार बारणे म्हणाले कि उरण मतदार संघांमध्ये शिवसेनेची फार मोठी ताकद आहे. हे विसरून चालणार नाही. नाकारता येत नाही.महायुती मधूनच मी पहिल्यांदा खासदार झालो. माझा पक्ष वाढविणे ही माझी जबाबदारी आहे. आम्हाला जनतेचे, सर्वसामान्य नागरिकांसाठी काम करायचे आहे. वंदनीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या विचारानुसार, तत्वानुसार वाटचाल सुरु आहे. त्यानुसार काम केले. कार्यकर्त्यांना नेहमी बळ देण्याचे काम केले. शिवसेनेचे धनुष्यबाण सर्व सामान्यापर्यंत पोहोचविण्यात यशस्वी झालो. राजकारण निवडणुकी पुरते ठीक आहे. विकास कामासाठी कधीही राजकारण करीत नाही. नेहमी स्थानिक भूमिपुत्रांना मदत करीत आलो आहोत. उरण विधानसभा मतदार संघात सेफ्टी झोन व विविध समस्या सोडविण्याचे काम केले.विविध समस्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. जो पर्यन्त गोर गरिबांचे, बाधीतांचे प्रश्न सुटत नाही तो पर्यंत कार्यरत राहणार. सर्वच निवडणुकीत गेल्या ३ वर्षात महाराष्ट्रात २ नंबरचा पक्ष म्हणून शिवसेना कार्यरत आहे. निवडणुकीत सुद्धा जनतेने शिवसेनेला भरभरून चांगला प्रतिसाद दिला आहे. भविष्यात जनतेसाठी चांगले काम करायचे आहे. जिथे जिथे मदत लागेल तिथे तिथे मी जनतेच्या पाठीशी नेहमी उभा आहे. सर्वांनी हेवे दावे सोडून पक्ष वाढवा. मी तू पणा, स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवा. ज्या पद्धतीने उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे साहेब जनतेसाठी काम करतात त्या पद्धतीने सर्वांनी उरण मध्ये काम करा. शिवसेना असा पक्ष आहे जो सर्वांना न्याय देतो, सर्वांच्या समस्या सोडवितो. सर्वांना सामावून घेतो असा पक्ष शिवसेना आहे. कार्यालयाचे उदघाटन झाले याचा मला सार्थ अभिमान आहे. उरण विधानसभा मतदार संघातील सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांचे मी आभार मानतो. निश्चितच या कार्यालयातून जनतेचे, गोर गरिबांचे प्रश्न समस्या सोडविले जातील असे मत व्यक्त करत खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी विविध पक्षातील शेकडो पदाधिकारी कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला.सदर कार्यक्रमाचे उत्तम असे सूत्रसंचालन राजेश पाटील तर आभार प्रदर्शन शहर अध्यक्ष सुलेमान शेख यांनी केले. एकंदरीत शिवसेना पक्ष कार्यलयाचे उदघाटन मोठया उत्साहात, उत्तम प्रतिसादात संपन्न झाले.

# दिव्यातील राज्यस्तरीय भव्य कराटे स्पर्धेत आनंद रोकडे सर संघ प्रथम विजेता



**संतोष पडवळ । ठाणे**

दिवा शहरातील प्रभास कराटे स्पोर्ट अकॅडमीच्या माध्यमातून प्रो. प्रशांत कसबे सर आयोजित भव्य आणि दिव्य कराटे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी मुंबईसह विविध शहरातून अनेक संघानी, स्पर्धकांनी भाग घेऊन दिवा शहराच्या नावलौकीकामध्ये भर घातली. विविध स्पर्धकांनी आपल्या कौशल्यातून उपस्थित सर्वांचीच मन जिंकली. गोल्ड, सिल्वर, ब्राँझ मेडल त्याचप्रमाणे विविध सन्मानचिन्हे पटकवून आपापल्या संघाचे नावलौकिक केलं. या स्पर्धेमध्ये १ ते ५ उत्कृष्ट संघ निवडण्यात आले, उत्कृष्ट सन्मान चिन्ह ट्रॉफी देऊन त्यांना गौरविण्यात आले प्रसंगी चंचल स्पोर्ट्स नाशिक - आनंद रोकडे सर यांच्या संघाने प्रथम पारितोषिक पटकावले तर प्रभास कराटे स्पोर्ट्स अकॅडमी-दिवा प्रशांत कसबे सर, सौ भारती कसबे मॅडम यांनी द्वितीय पारितोषिकेत पटकावले तर वारीअर स्पोर्ट कराटे असोसिएशन गोवंडी - प्रदीप ओव्हाळ सर यांच्या संघाने तृतीय, थापा सर यांच्या संघाने चौथा तर उमा मॅडम - टिटवाळा यांच्या संघाने पाचवं पारितोषिक पटकावून सामन्याला रंगात आणली.

युनायटेड मार्शल आर्ट अकॅडमी इंडिया ग्रँडमास्टर रवींद्र केणी सर - सायन त्याचबरोबर मुलानी सर- ठाणे, कोरी सर -कल्याण यांनी स्पर्धेचं पंच म्हणून कुशल नेतृत्व करून उत्कृष्ट कामगिरी पार पाडली. आयोजन नियोजनामध्ये दिवा शहरातील समाजसेवक प्रविण उतेकर, आकाशराव विचारे, जयसिंग कांबळे, सतीश निकम त्याचप्रमाणे विश्वास भालेराव, विशाल मन्ना डे, संगीता उतेकर, पार्वती आनंदा कसबे, मनीषा लांडगे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग घेऊन सहकार्य करून, मार्गदर्शन करून उपस्थित मुलांमध्ये नवचैतन्य निर्माण केलं. एवढ्या मोठ्या प्रमाणात स्पर्धांचे आयोजन करण्यामागचा मुख्य उद्दिष्ट दिवा शहरातील भावी पिढी सक्षम बनवणे हाच आहे असं कार्य प्रशांत कसबे सर आणि त्यांच्या सौभाग्यवती भारती कसबे मॅडम यांच्यामार्फत दिवानगरीमध्ये घडत आहे.

# उपमुख्यमंत्री व खासदार बदमानी प्रकरणी मुंब्रा पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

## शिवसेना नगरसेवक शैलेश पाटील आक्रमक

**संतोष पडवळ । ठाणे**

मुंब्रा येथील मुंब्रा पोलीस स्टेशनला लागूनच असलेल्या मुंब्रा ते दिवा जोडरस्त्यावरील (चुहा ब्रिज) येथून अवैध रित्या कांदळवनाची कत्तल करून तसेच नैसर्गिक नाले बुजवून खाडीपात्रामंध्ये मोठ्या प्रमाणावर भरणी करण्याचे काम सुरु आहे. हि भरणी करणाऱ्या बांधकाम व्यवसायिक तसेच त्याचे गुंड प्रवृत्तीचे सहकारी यांच्यावर तात्काळ गुन्हा नोंदवण्यात यावा. तसेच वरील प्रकरणात कोणताही संबंध नसताना विनाकारण महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे व कल्याण लोकसभेचे खासदार श्रीकांत एकनाथ शिंदे यांची बदनामी करणाऱ्या इसमावर तात्काळ गुन्हा नोंदवून त्याला अटक करावी अशी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे ठाणे महापालिकेचे नगरसेवक शैलेश मनोहर पाटील व



पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह काही स्थानिक शेतकरी यांनी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे धाव घेत प्रकरणी संबंधितावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधितावर त्वरित तक्रार दाखल करून घेतली असून लवकरच चौकशी करून कठोर कारवाई करू असे आश्वासन दिले आहे. अवैध्य भरणी व कांदळवन तोड प्रकरण आणि गेली २५ ते ३० वर्षांपासून सुरु असलेला दिवा मुंब्रा रोड ( चुहा ब्रिज ) मार्गे तात्काळ सुरु करण्यासाठी शिवसेना नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी संबंधित विभागात पत्रव्यवहार केला असून दिलेल्या मुदतीत तात्काळ कारवाई न झाल्यास उग्र आंदोलन करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# मराठवाड्यातील अनन्या आरोही यांची मुंबईतील फॅशन शो मध्ये मोठी झलक

**नांदेड । प्रतिनिधी**

मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या ऑल इंडिया इंटरनॅशनल फॅशन शो मध्ये मराठवाड्यातील लातूर येथिल अनन्या गणेश साळुंके व आरोही गणेश साळुंके या दोन्ही बहिणींनी चांगल्या प्रकारे प्रदर्शन करून पुरस्कार पटकावला चार्ल्स विल्यम यांची संकल्पना असलेल्या या फॅशन शोचे आयोजन सोनल म्हात्रे व सुशांत भोईर यांनी केले होते.देशभरात १५ वेगवेगळ्या डिझाईनर्ससाठी तब्बल ५०० मॉडेल्सची निवड केली होती.या कार्यक्रमाला जगभरातील अनेक दिग्दर्शन व निर्मात्यांची उपस्थिती होती सदरील फॅशन शो मुंबईतील साई पॅलेस गार्डनमध्ये पार पडला मराठवाड्यातील लातूर इथल्या अनन्या गणेश साळुंके व आरोही गणेश साळुंके यांनी सदरील फॅशन शो मध्ये उत्कृष्ट प्रदर्शन घडविले आयोजकांनी अनन्या साळुंके व आरोही साळुंके यांना पुरस्कार देऊन गौरविले यापूर्वीही अनन्या साळुंके व आरोही साळुंके यांनी अनेक स्पर्धांमध्ये मोठ मोठे पुरस्कार पटकावले आहेत.

# मेहता महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**मुंबई । प्रतिनिधी**

ऐरोलीच्या मेहता महाविद्यालयात २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा झाला. भाषा दिनानिमित्त 'उत्सव मायबोलीचा' हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रेक्षागृहात सादर करण्यात आला. या कार्यक्रमात कनिष्ठ व पदवी महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला सौ. दिपाली वलेकर यांनी मराठी भाषा दिनाचे महत्त्व सांगून मराठी वाड्.मय मंडळाची भूमिका स्पष्ट केली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आर. देशपांडे व उपप्राचार्य प्रा. एन. के. पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बी. आर. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषादिनाच्या शुभेच्छा दिल्या व विंदा करंदीकरांची कविता सादर करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. उपप्राचार्य प्रा. एन. के. पाटील यांनीही आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या



'उत्सव मायबोलीचा' या कार्यक्रमाची सुरूवात गणेशवंदनेने झाली. त्यानंतर प्रणाली अहिरेकर या विद्यार्थीनीने मराठी अभिमान गीत गाऊन सगळ्यांची मनं जिंकली. कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे अशा अनेक प्रसिद्ध कवींच्या कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या. वि. स. खांडेकर यांची 'गवताचे पाते' ही रूपक कथाही सादर करण्यात आली. वीर रसाने परिपूर्ण असा शिवाजी महाराजांवरचा पोवाडा, होनाजीबाळा लिखित प्रसिद्ध लावणी सादर करण्यात आली. परदेशात मराठी भाषा संवर्धन कसे चालते हे सांगणारा 'मराठी तितुकी मेळवावी' हा लेखही सादर करण्यात आला. मराठी सणांची धावती झलक विद्यार्थीनींच्या सुरेख नृत्यातून प्रेक्षकाना पाहायला मिळाली. डॉ. जया आनंद यांनी ज्ञानेश्वरांचा अभंग गाऊन कार्यक्रमाची रंगत वाढवली.

या कार्यक्रमाचं प्रास्ताविक शर्वरी म्हात्रे या विद्यार्थीनीने केले, तर आभार प्रदर्शन मराठी भाषा आणि वाड्.मय मंडळ प्रमुख सौ. मंगल कातकर यांनी केले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ठ सूत्रसंचालन यश पवार व अनुष्का सणस या विद्यार्थ्यांनी केले. हा कार्यक्रम पाहण्यासाठी प्राचार्य, उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. तृथी प्रदीप, पदवी व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# पत्रकार राकेश खराडे यांना कोकणातून उत्कृष्ट पत्रकार संघटक पुरस्काराने सन्मानित

**कर्जत । जयेश जाधव**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी वाशिम –विदर्भ येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार व पदाधिकारी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या राज्यस्तरीय पत्रकार संम्मेलनाचे उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, अयोध्या मंदिर कोषाध्यक्ष भागवताचार्य प.पू.रमाकांत व्यास,पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याहस्ते कोकण विभाग उत्कृष्ट संघटक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी राज्यस्तरीय अधिवेशनात पत्रकार राकेश खराडे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.यावेळी सहकार



मंत्री आकाश फुंडकर, एबिबी माझा टिव्ही वाहिनीचे संपादक राजीव खांडेकर,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे आदींसह विविध प्रसार वाहिन्या व वर्तमानपत्रांचे संपादक, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात राज्यातील एकूण दहा उत्कृष्ट पत्रकारांना गौरविण्यात आले.यावेळी पत्रकारांचा डिएनए काय व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण तर होत नाही ना? या विषयावर चर्चा सत्र होवून जेष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे यांनी सायबर युगातील माध्यमे आणि मुल्यनिष्ठ पत्रकारीता या विषयावर मार्गदर्शन केले.अधिवेशनाला राज्यातील विविध टि व्ही वाहिन्यांचे तसेच प्रिंट मिडीयाचे प्रतिनिधी शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.

# श्री कृष्ण यात्रेमध्ये सावरगाव पी.येथे कुस्त्याचा फड चांगलाच रंगला



**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड तालुक्यातील सावरगाव पि.येथे श्रीकृष्ण यात्रे निमित्य कुस्तिचा फड चांगलाच रंगला यावेळी पर जिल्ह्यातुन मोठ्या प्रमाणात मल्लांनी हजेरी लावली. यावेळी शेवटची कुस्ती लावताना मंत्रालय मुंबई येथिल गोपीनाथ कांबळे,सरपंच मुजाहेदाली इनामदार,माजी सरपंच शौखतखान पठाण,विठ्ठलराव देवकत्ते, संगमेश्वर पाटील देवकत्ते, माधवराव कबीर, मनोज कांबळे, संजय कोरे,शिवाजी मुसांडे सह गावकरी.

# पनवेल भाजपचा 'मास्टरस्ट्रोक' ठरणार का इक्बाल काझी?; 'स्विकृत'साठी मुस्लिम समाजाचा कौल

**पनवेल । प्रतिनिधी**

राजकारणात कधी कधी निवडणुकीतील 'आकडे' हरतात, पण 'माणूस' जिंकलेला असतो. पनवेल महानगरपालिकेच्या राजकारणात सध्या असंच काहीसं चित्र प्रभाग क्रमांक १४ बाबत पाहायला मिळत आहे. या प्रभागातून निवडणूक लढवलेले उद्योजक आणि दानशूर व्यक्तिमत्व इक्बाल काझी यांना 'स्विकृत नगरसेवक' म्हणून पालिकेत संधी मिळावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. ही केवळ एक राजकीय मागणी नसून, मुस्लिम समाजाने भाजपच्या नेतृत्वासमोर टाकलेला एक 'गुगली' मानला जात आहे.

**प्रभाग १४ मधील 'ती' पोकळी भरून काढण्याची संधी**

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत महायुतीने सत्ता तर स्थापन केली, पण मुस्लिम बहुल प्रभाग १४ मध्ये कमळ फुलवण्यात यश आले नाही. याचे विश्लेषण करताना जाणकार सांगतात की, तिथल्या माजी नगरसेवकांबद्दल असलेली नाराजी आणि अंतर्गत गटबाजी भाजपला नडली. पण, याच काळात एक नाव सातत्याने चर्चेत राहिले ते म्हणजे इक्बाल काझी. निवडणूक हरूनही लोकांच्या अडीअडचणीला धावून जाणारा हा नेता आता मुस्लिम समाजासाठी आशेचा किरण बनला आहे.

**'एज्युकेशन' ते 'कॉर्पोरेशन': काझींचा दांडगा अनुभव**

पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. एक यशस्वी उद्योजक आणि तितकेच संवेदनशील समाजसेवक ही त्यांची ओळख केवळ एका समाजापुरती मर्यादित नाही. नगरसेवकपद नसतानाही त्यांनी केलेले कार्य हे सत्तेत असलेल्या अनेकांसाठी 'आयना' दाखवण्यासारखे आहे. त्यामुळेच, अशा अनुभवी चेहऱ्याला पालिकेत स्थान मिळावे, असा



सूर उमटत आहे.

**भाजपसाठी 'विनींग कार्ड' ठरणार?**

मुस्लिम समाजाची ही मागणी मान्य केल्यास भाजपला दोन मोठे फायदे होऊ शकतात. भाजप मुस्लिम विरोधक नाही हा संदेश थेट जमिनीवर पोहोचेल आणि प्रभागातील विकासकामे मार्गी लागल्यास, आगामी निवडणुकांमध्ये भाजपला या भागात कोणीही रोखू शकणार नाही.

आम्हाला असा प्रतिनिधी हवा आहे जो फक्त निवडणुकीपुरता दिसणारा नसावा. इक्बाल काझी यांनी आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. त्यांना संधी देऊन भाजपने मुस्लिम बांधवांच्या विश्वासाला दाद द्यावी, अशी भावना एका स्थानिक सुशिक्षित तरुणाने व्यक्त केली.आता चेंडू भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या दरबारात आहे. लोकभावनेचा आदर करत 'सबका साथ, सबका विकास' या मंत्राला जागत इक्बाल काझी यांना पालिकेची पायरी चढण्याची संधी मिळणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# दिवागाव समशानभूमी समोरील तलाव परिसरातील उद्यानात रात्री मद्यपींचा सुळसुळाट

## पोलीस गस्त नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी

**मुंबई । प्रतिनिधी**

दिवागाव परिसरातील विविध सेक्टर सार्वजनिक उद्याने नागरिकांची सकाळी सायंकाळी फिरण्यासाठीची व्यायामासाठी तसेच लहान मुल मुलींची खेळांसाठी महत्त्वाची ठिकाणी मानली जातात मात्र अलीकडेच काही दिवसापासून तलाव परिसरातील उद्यानात मध्ये रात्री मद्यपींचा सुळसुळाट वाढल्याने स्थानिक नागरिकाकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे नवी मुंबई महानगरपालिकेकडून दिवागाव परिसरात लहान छोटे मोठे तलाव उद्याने विकसित केले आहेत विशेष तलाव परिसरातील छोट्या उद्यानात रात्री उशिरापर्यंत तरुणांचे गट बसून मद्यपान करत असल्याचे चित्र दिसत आहे मद्यपानानंतर काचेच्या बाटल्या प्लास्टिकचा कचरा त्या उद्यानामध्ये आढळून येतो त्या तलाव परिसरांमध्ये मद्यपीकडुन वापरण्यात आलेल्या वस्तूंचा वास येतो व वापरलेल्या वस्तू तेथेच टाकून घरी जात असल्याने तलाव परिसरातील उद्यानाची स्वच्छ्ता बिघडत आहे सकाळी फिरण्यासाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना तसेच लहान मुलांसोबत येणाऱ्या पालकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो रात्री उशिरा हे मद्यपी टोळक्याने बसत असून रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या रहिवाशांना त्यात कॉलेजची मुलं मुली लहान मुलं काही महिला जात असताना त्यांच्या हे निदर्शनास येत असते परंतु रात्र असल्या कारणाने काही स्थानिक जनता अशा मद्यपींना बोलण्यास टाळाटाळ करून मुग गिळून गप्प आहेत रात्री पोलीस गस्त नसल्याने मद्यपींच्या गैरप्रकारांना आळा बसत नाही त्यामुळे महिलांमध्ये आणि जेष्ठ नागरिकांमध्ये असुरक्षितेची भावना वाढीस लागली आहे रबाले पोलीस ठाणे आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली विभाग कार्यालय या पालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही उद्यानामध्ये वावरणाऱ्या मद्यपी वर ठोस कारवाई होत नसल्याची खंत स्थानिक रहिवाशी व्यक्त करीत आहेत रबले पोलिसांनी रात्री नियमित पोलीसग्रस्त वाढवावी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कठोर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी दिवा गावातील उद्यान परिसरात राहणाऱ्या नागरिकांकडून करण्यात येत आहे दरम्यान सार्वजनिक ठिकाणची पवित्रता आणि सुरक्षितता जपणे प्रशासनाची जबाबदारी आहे मात्र नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून सार्वजनिक ठिकाणची पवित्रता आणि सुरक्षितता याकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे वसाहतीच्या मध्यभागी असलेल्या या तलाव परिसरातील उद्यानाच्या कडेला रात्री बारा ते दोन या वेळेत मद्यपिंचा सुळसुळाट दिसतो सदर प्रकार गेल्या तीन ते चार वर्षापासून सुरू आहे स्थानिक नागरिकांनी मद्यपींना मनाई केल्यास नागरिकांना मारहाण करण्याची धमकी दिली जाते याशिवाय उभे असलेल्या वाहनातून पेट्रोल चोरीचे प्रकार वाढले आहेत दरम्यान अशा प्रकारा मुळे दिवागाव परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे सदर प्रकार पोलिसांनी कायमचा बंद करणे आवश्यक आहे असे नाव न सांगण्याच्या अटीवर स्थानिक रहिवाशांनी आपली प्रतिक्रिया दिली.

> **दिवागाव तलाव उद्यानाच्या परिसरात रात्री पोलिसांची ग्रस्त नियमितपणे सुरू केली जाईल तसेच नागरिकांच्या काही तक्रारी असतील तर पोलीस गस्तीचे प्रमाण आणखी वाढविले जाईल.**
> **–बाळकृष्ण सावंत वरिष्ठ पोलीस निरीक्षक रबाले पोलीस ठाणे**

# वर्दीच्या गुर्मीत मारहाण करणारे RTO अधिकारी अखेर निलंबित

**पनवेल । प्रतीनिधी**

किरकोळ कारणावरून कायदा हातात घेऊन मारहाण करणाऱ्या RTO अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. सूरजगडचे आरटीओ सुरेश बिश्नोई आणि रतनगड चरु चे आरटीओ सुरेश पूनिया यांमी वाहन चालक यांच्याशी अशोभनीय वर्तन करत त्याला मारपीट केली होती. कोणतीही चूक नसताना आपल्या वर्दीचा धाक दाखवत वाहनचालक याला मारहाण केली होती. त्याविरोधात अखिल भारतीय ट्रांसपोर्ट एसोसिएशन जयपुर राजस्थान यांनी आक्रमक भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी केली होती. ट्रान्सपोर्ट संघटनेच्या




आंदोलनाचा रुद्र रूप पाहून सूरजगडचे आरटीओ सुरेश बिश्नोई आणि रतनगड चरु चे आरटीओ सुरेश पूनिया यांना अशोभनीय वर्तन आणि मारहाण केल्या बद्दल निलंबित करण्यात आले.



**ठाणे : दिव्यात सखी महिला बचत गट आयोजित भव्य हळदी कुंकू समारंभ पार पडला. सदर बचत गटाचे हे ४ थे वर्ष असून अध्यक्ष सोनाक्षी भाबल, उपाध्यक्षः – सुनिता मेस्त्री, खजिनदार शितल लाड, सचिव गौरी बेर्डे हे पदाधिकारी आपल्या सहकारी महिलांसह अनेक सामाजिक उपक्रम राबवतात. ( फोटो – संतोष पडवळ)**

# घणसोलीत मराठी राजभाषेचा जल्लोष; विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी रंगला सोहळा, मराठी शाळांबाबत नगरसेवकांचा खणखणीत इशारा!

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधत घणसोली सेक्टर ५ येथे साईदत्त मित्र मंडळ आणि S. D. Boys यांच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कविता वाचन, वक्तृत्व, चित्रलेखन, हस्ताक्षर, नृत्य आणि गायन अशा विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभिमान जिवंत ठेवत आपले कलागुण सादर केले.कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेषतः विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी सहभाग घेत स्पर्धा रंगतदार केल्या. विजेत्या स्पर्धकांना पुस्तके भेट देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास नगरसेवक प्रशांत पाटील, माजी नगरसेविका सुवर्णा पाटील





तसेच लक्ष्मीपुत्र सोडगी यांची प्रमुख उपस्थिती होती. न्यू बॉम्बे सिटी स्कूलच्या प्राचार्या सुरेखा पिसाळ, उपप्राचार्य पारस पटेल आणि ॲड. शुभांगी काळे यांनीही कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी बोलताना नगरसेवक प्रशांत पाटील यांनी थेट भाष्य करत सांगितले की, राज्यात मराठी शाळांची संख्या घटत आहे. पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे वाढता कल चिंताजनक आहे. मराठी भाषा टिकवायची असेल तर समाजाने मराठी शाळांना पाठबळ दिले पाहिजे. त्यांच्या या स्पष्ट वक्तव्याने उपस्थितांमध्ये चर्चा रंगली. मराठीच्या जतनासाठी केवळ घोषणाबाजी नको, तर कृती हवी, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. साईदत्त मित्र मंडळाचे अध्यक्ष सागर किरुळकर, कार्याध्यक्ष विजय पाटील, सचिव विशाल जानकर,खजिनदार मनोज घाडगे तसेच सल्लागार विजय काळे व राहुल दळवी यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम यशस्वी झाला. मराठी राजभाषेचा सन्मान करत नव्या पिढीला मराठीची गोडी लावण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरला आहे.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५